# रत्नागिरी उपविभागातील रिक्त असलेली पोलीस पाटील पदे भरणेबाबत जाहिरनामा
## जाहिरात क्रमांक 01/2023

रत्नागिरी जिल्हयातील रत्नागिरी उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील ( तालुका- रत्नागिरी, संगमेश्वर) गावात पोलीस पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑनलाईन पध्दतीने अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहे.

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 07/09/2023 पासून | दिनांक 20/09/2023 रोजी 23-59 वाजेपर्यंत |

**परीक्षा शुल्क खालीलप्रमाणे विहीत पध्दतीने भरावे लागेल.**

| | |
|---|---|
| खुला प्रवर्ग - रुपये 600/- | Online **payment पद्धतीने** |
| मागास/आर्थीक दृष्टया दुर्बल घटक प्रवर्गासाठी - रुपये 500/- | |

(वर दर्शविण्यात आलेले प्रक्रिया शुल्क बँक प्रोसेसिंग चार्जेस वगळून आहे.)

Phonepe, GPay, नेटबँकिंग / डेबिट कार्ड / क्रेडीट कार्डद्वारे ऑनलाईन पद्धतीने प्रक्रिया शुल्क भरल्यास निवडलेल्या पर्यायानुसार आवश्यक ते बँकेचे सेवा शुल्क भरावे लागेल.

ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (**Payment Transaction Successful** झाल्याची संपूर्ण खात्री करुन घ्यावी, प्रक्रिया शुल्क भरण्याकरीता नेटबँकिंग / डेबिटकार्ड / क्रेडीटकार्ड वापरून होणाऱ्या व्यवहारांची संपुर्णतः जबाबदारी उमेदवाराची आहे व **उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, रत्नागिरी** यांस जबाबदार असणार नाही.

सरळ सेवा भरती प्रक्रियेची सविस्तर जाहिरात https://ratnagiri.ppbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. अर्जदाराने संपूर्ण प्रक्रिया काळजीपूर्वक समजून ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. पोलीस पाटील पदाचे परीक्षेचे अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील. प्रस्तूत पदाकरीता केवळ उक्त स्थळावरच ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व विहीत परिक्षा शुल्क असलेले अर्ज ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे परीक्षा शुल्क स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळावर भरती प्रक्रिया दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत व जागृत राहण्याची जबाबदारी अर्जदाराची राहील.

भरती प्रक्रिया परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशत: बदल करणे पदाच्या एकूण संख्येत व आरक्षण प्रवर्गनिहाय संख्यामध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात वाद तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार उपविभागीय दंडाधिकारी रत्नागिरी यांनी राखून ठेवले असून त्यांचा निर्णय अंतिम असेल, याची सर्वांनी नोंद घ्यावी. रत्नागिरी उपविभागातील पोलीस पाटलांची मंजूर पदे भरणे आवश्यक आहे. त्याबाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (**अनुसूचित जाती** आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल )

| अक्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | कपिलवस्तू | अनुसूचित जाती | महिला |
| 2 | रत्नागिरी | साखरमोहल्ला (जयगड) | अनुसूचित जाती | महिला |
| 3 | रत्नागिरी | मराठवाडी (सैतवडे) | अनुसूचित जाती | --- |
| 4 | रत्नागिरी | तरवळ | अनुसूचित जाती | महिला |
| 5 | रत्नागिरी | लाजूळ | अनुसूचित जाती | महिला |
| 6 | रत्नागिरी | कासारी | अनुसूचित जाती | --- |
| 7 | रत्नागिरी | पानवल | अनुसूचित जाती | महिला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | रत्नागिरी | साठरे | अनुसूचित जाती | --- |
| 9 | रत्नागिरी | आंबेशेत | अनुसूचित जाती | महिला |
| 10 | संगमेश्वर | भिमनगर | अनुसूचित जाती | --- |
| 11 | संगमेश्वर | मासरंग | अनुसूचित जाती | महिला |
| 12 | संगमेश्वर | उमरे | अनुसूचित जाती | महिला |
| 13 | संगमेश्वर | बोरसुत | अनुसूचित जाती | --- |
| 14 | संगमेश्वर | फणसट | अनुसूचित जाती | महिला |
| 15 | संगमेश्वर | ताम्हाणे | अनुसूचित जाती | --- |
| 16 | संगमेश्वर | मेढे त. फुणगूस | अनुसूचित जाती | --- |
| 17 | संगमेश्वर | तुळसणी | अनुसूचित जाती | --- |
| 18 | संगमेश्वर | तिवरे तर्फे देवळे | अनुसूचित जाती | --- |
| 19 | संगमेश्वर | चांदिवणे | अनुसूचित जाती | महिला |
| 20 | संगमेश्वर | मेघी | अनुसूचित जाती | महिला |
| 21 | संगमेश्वर | जांभूळवाडी | अनुसूचित जाती | महिला |
| 22 | संगमेश्वर | डावखोल | अनुसूचित जाती | महिला |
| 23 | संगमेश्वर | राजिवली | अनुसूचित जाती | --- |
| 24 | संगमेश्वर | चोरवणे | अनुसूचित जाती | --- |
| 25 | संगमेश्वर | कर्ली | अनुसूचित जाती | --- |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (अनुसूचित जमाती आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल )

| **अक्र** | **तालुक्याचे नाव** | **गावाचे नाव** | **आरक्षित प्रवर्ग** | **महिला आरक्षण** |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | सडामि-या | अनुसूचित जमाती | --- |
| 2 | रत्नागिरी | कुवारबांव | अनुसूचित जमाती | --- |
| 3 | रत्नागिरी | मयेकरवाडी (काळबादेवी) | अनुसूचित जमाती | महिला |
| 4 | रत्नागिरी | सैतवडे | अनुसूचित जमाती | महिला |
| 5 | रत्नागिरी | कळझोंडी | अनुसूचित जमाती | महिला |
| 6 | रत्नागिरी | धामणसे | अनुसूचित जमाती | महिला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | रत्नागिरी | कुरतडे | अनुसूचित जमाती | --- |
| 8 | रत्नागिरी | जमातवाडी (जांभारी) | अनुसूचित जमाती | --- |
| 9 | रत्नागिरी | तोणदे | अनुसूचित जमाती | महिला |
| 10 | संगमेश्वर | नावडी | अनुसूचित जमाती | महिला |
| 11 | संगमेश्वर | कोंडअसुर्डे | अनुसूचित जमाती | --- |
| 12 | संगमेश्वर | निवळी | अनुसूचित जमाती | --- |
| 13 | संगमेश्वर | कोंडभजबळराव | अनुसूचित जमाती | --- |
| 14 | संगमेश्वर | मुरादपूर | अनुसूचित जमाती | --- |
| 15 | संगमेश्वर | धामणी | अनुसूचित जमाती | --- |
| 16 | संगमेश्वर | वांद्री | अनुसूचित जमाती | --- |
| 17 | संगमेश्वर | धामापूर तर्फे देवरुख | अनुसूचित जमाती | महिला |
| 18 | संगमेश्वर | आंबेड खुर्द | अनुसूचित जमाती | महिला |
| 19 | संगमेश्वर | ओझरखोल | अनुसूचित जमाती | --- |
| 20 | संगमेश्वर | वाशी त.संगमेश्वर | अनुसूचित जमाती | --- |
| 21 | संगमेश्वर | शिवधामापूर (नवीन गाव) | अनुसूचित जमाती | --- |
| 22 | संगमेश्वर | कोळंबे | अनुसूचित जमाती | --- |
| 23 | संगमेश्वर | कांटे | अनुसूचित जमाती | --- |
| 24 | संगमेश्वर | निवेखूर्द | अनुसूचित जमाती | --- |
| 25 | संगमेश्वर | कोंडिवरे | अनुसूचित जमाती | --- |
| 26 | संगमेश्वर | शिरंबे | अनुसूचित जमाती | --- |
| 27 | संगमेश्वर | वाशी त. देवरुख | अनुसूचित जमाती | --- |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (विमुक्त जाती (अ) आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल )

| अक्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | ओरी | विमुक्त जाती (अ) | --- |
| 2 | संगमेश्वर | रांगव | विमुक्त जाती (अ) | महिला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | संगमेश्वर | देवडे | विमुक्त जाती (अ) | --- |
| 4 | संगमेश्वर | कोसुंब | विमुक्त जाती (अ) | महिला |
| 5 | संगमेश्वर | करजुवे | विमुक्त जाती (अ) | महिला |
| 6 | संगमेश्वर | आरवली | विमुक्त जाती (अ) | --- |
| 7 | संगमेश्वर | घाटिवळे खुर्द | विमुक्त जाती (अ) | --- |
| 8 | संगमेश्वर | कानलकोंड | विमुक्त जाती (अ) | --- |
| 9 | संगमेश्वर | साखळकोंड | विमुक्त जाती (अ) | --- |
| 10 | संगमेश्वर | असुर्डे | विमुक्त जाती (अ) | --- |
| 11 | संगमेश्वर | माखजन | विमुक्त जाती (अ) | महिला |
| 12 | संगमेश्वर | तामनाळे | विमुक्त जाती (अ) | --- |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (भटक्या जमाती (ब) आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल)

| अक्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | चांदोर | भटक्या जमाती (ब) | महिला |
| 2 | रत्नागिरी | कोठारवाडी (चरवेली) | भटक्या जमाती (ब) | महिला |
| 3 | संगमेश्वर | वांझोळे खुर्द | भटक्या जमाती (ब) | --- |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (भटक्या जमाती (क) आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल)

| अक्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | वळके | भटक्या जमाती (क) | महिला |
| 2 | रत्नागिरी | मुसलमानवाडी (गोळप) | भटक्या जमाती (क) | --- |
| 3 | रत्नागिरी | मावळंगे | भटक्या जमाती (क) | --- |
| 4 | रत्नागिरी | माचिवलेवाडी (तरवळ) | भटक्या जमाती (क) | --- |
| 5 | रत्नागिरी | चिंद्रवली | भटक्या जमाती (क) | --- |
| 6 | संगमेश्वर | दखिण | भटक्या जमाती (क) | --- |
| 7 | संगमेश्वर | किरबेट | भटक्या जमाती (क) | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 8 | संगमेश्वर | मळदेवाडी | भटक्या जमाती (क) | --- |
| 9 | संगमेश्वर | पाचांबे | भटक्या जमाती (क) | महिला |
| 10 | संगमेश्वर | कुळये | भटक्या जमाती (क) | --- |
| 11 | संगमेश्वर | विकासनगर (कडवई) | भटक्या जमाती (क) | --- |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (भटक्या जमाती (ड) आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल)

| अक्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | गणपतीपुळे (मालगुंड) | भटक्या जमाती (ड) | --- |
| 2 | रत्नागिरी | नवा सोमेश्वर (सोमेश्वर) | भटक्या जमाती (ड) | --- |
| 3 | रत्नागिरी | साखरतर (काळबादेवी) | भटक्या जमाती (ड) | --- |
| 4 | रत्नागिरी | कर्ला मुसलमानवाडी | भटक्या जमाती (ड) | --- |
| 5 | रत्नागिरी | डांगेवाडी (हातखंबा) | भटक्या जमाती (ड) | --- |
| 6 | रत्नागिरी | भोळेवाडी (काळबादेवी) | भटक्या जमाती (ड) | महिला |
| 7 | रत्नागिरी | खालगाव | भटक्या जमाती (ड) | महिला |
| 8 | संगमेश्वर | कडवई | भटक्या जमाती (ड) | --- |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (विशेष मागास प्रवर्ग -आरक्षण तक्ता )

| अक्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | खारवीवाडी (जांभारी) | विशेष मागास प्रवर्ग | महिला |
| 2 | रत्नागिरी | ठिकाण सोमण (पूर्णगड) | विशेष मागास प्रवर्ग | --- |
| 3 | रत्नागिरी | नाचणे (म्यु बाहेर) | विशेष मागास प्रवर्ग | --- |
| 4 | रत्नागिरी | मुसलमानवाडी (कोतवडे) | विशेष मागास प्रवर्ग | --- |
| 5 | रत्नागिरी | मुस्लिमवाडी (गावखडी) | विशेष मागास प्रवर्ग | महिला |
| 6 | रत्नागिरी | खालची वाडी वेतोशी | विशेष मागास प्रवर्ग | --- |
| 7 | रत्नागिरी | काळबादेवी | विशेष मागास प्रवर्ग | --- |
| 8 | रत्नागिरी | झाडगाव म्यु. बाहेर | विशेष मागास प्रवर्ग | --- |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) - आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल)

| अक्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | कचरे | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 2 | रत्नागिरी | सत्कोंडी | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | --- |
| 3 | रत्नागिरी | उंडी | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 4 | रत्नागिरी | म्हामुरवाडी | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | --- |
| 5 | रत्नागिरी | नातुंडे | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 6 | रत्नागिरी | बागपाटोळे | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | --- |
| 7 | रत्नागिरी | चिखलवाडी (देऊड) | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 8 | रत्नागिरी | भंडारवाडी (गावखडी) | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 9 | रत्नागिरी | कुंभारवाडा (करबुडे) | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 10 | रत्नागिरी | कुणबीवाडी (नांदिवडे) | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | --- |
| 11 | रत्नागिरी | उंबरवाडी (कोतवडे) | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 12 | संगमेश्वर | कोंडभैरव | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 13 | संगमेश्वर | कातुर्डीकोंड | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |
| 14 | संगमेश्वर | रातांबी | इतर मागास प्रवर्ग (ओ.बी.सी.) | महिला |

पोलीस पाटील रिक्त पदभरती -2023 (खुला - आरक्षणानुसार रिक्त पदांचा तपशिल )

| अ क्र | तालुक्याचे नाव | गावाचे नाव | आरक्षित प्रवर्ग | महिला /(E.W.S) आरक्षण |
|---|---|---|---|---|
| 1 | रत्नागिरी | ठिकाण चक्रदेव | खुला | महिला |
| 2 | रत्नागिरी | मुसलमानवाडी (शिरगांव) | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 3 | रत्नागिरी | आडी (शिरगांव) | खुला | महिला |
| 4 | रत्नागिरी | तिवंडेवाडी (शिरगांव) | खुला | --- |
| 5 | रत्नागिरी | दाभिळ आंबेरे | खुला | महिला |
| 6 | रत्नागिरी | मजगांव | खुला | महिला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | रत्नागिरी | सरफरेवाडी (खानू) | खुला | महिला |
| 8 | रत्नागिरी | शिवार आंबेरे | खुला | --- |
| 9 | रत्नागिरी | मराठवाडी (मालगुंड) | खुला | --- |
| 10 | रत्नागिरी | वैद्यलावगण | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 11 | रत्नागिरी | तारवेवाडी (हातखंबा) | खुला | --- |
| 12 | रत्नागिरी | जाकिमि-या | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 13 | रत्नागिरी | मिरजोळे | खुला | महिला |
| 14 | रत्नागिरी | भगवतीनगर (निवेंडी) | खुला | --- |
| 15 | रत्नागिरी | पेठपूर्णगड | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 16 | रत्नागिरी | वाडाजून | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 17 | रत्नागिरी | घवाळीवाडी (पानवल) | खुला | --- |
| 18 | रत्नागिरी | रहाटागर (मालगुंड) | खुला | महिला |
| 19 | रत्नागिरी | पिरंदवणे | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 20 | रत्नागिरी | निवळी | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 21 | रत्नागिरी | नांदिवडे | खुला | --- |
| 22 | रत्नागिरी | ठिकाण बेहेरे (पूर्णगड) | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 23 | रत्नागिरी | आंबेकरवाडी (निवळी) | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 24 | रत्नागिरी | डोर्ले | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 25 | रत्नागिरी | नेवरे काजिरभाटी | खुला | महिला |
| 26 | रत्नागिरी | वायंगणी | खुला | --- |
| 27 | रत्नागिरी | भोके | खुला | --- |
| 28 | रत्नागिरी | भंडारवाडी (मालगुंड) | खुला | --- |
| 29 | रत्नागिरी | करबुडे | खुला | --- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 30 | रत्नागिरी | कोंड (फणसवळे) | खुला | महिला |
| 31 | रत्नागिरी | वाडामि-या (मि-या) | खुला | आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटक (E.W.S) |
| 32 | रत्नागिरी | धनावडेवाडी | खुला | महिला |
| 33 | रत्नागिरी | मायंगडेवाडी (तरवळ) | खुला | महिला |
| 34 | रत्नागिरी | भंडारवाडा (वरवडे) | खुला | महिला |
| 35 | रत्नागिरी | मधलीवाडी (वेतोशी) | खुला | आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटक (E.W.S) |
| 36 | रत्नागिरी | वेळवंड | खुला | महिला |
| 37 | रत्नागिरी | सडये | खुला | --- |
| 38 | रत्नागिरी | वरवडे | खुला | आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटक (E.W.S) |
| 39 | संगमेश्वर | आंबेट | खुला | --- |
| 40 | संगमेश्वर | किंजळे पुनर्वसन | खुला | --- |
| 41 | संगमेश्वर | कुरधुंडा खुर्द | खुला | आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटक (E.W.S) |
| 42 | संगमेश्वर | मुसलमानवाडी (आंबवली) | खुला | महिला |
| 43 | संगमेश्वर | सोनगिरी (आंबेड बु.) | खुला | --- |
| 44 | संगमेश्वर | कोंडउमरे | खुला | --- |
| 45 | संगमेश्वर | कसबा संगमेश्वर | खुला | --- |
| 46 | संगमेश्वर | वाडिआदिष्टी | खुला | महिला |
| 47 | संगमेश्वर | देवळे घेरा प्रचितगड | खुला | --- |
| 48 | संगमेश्वर | शिंदे आंबेरी | खुला | --- |
| 49 | संगमेश्वर | फुणगूस | खुला | --- |
| 50 | संगमेश्वर | तळे | खुला | --- |
| 51 | संगमेश्वर | पूर्ये त. सावर्डा | खुला | --- |
| 52 | संगमेश्वर | किरडूवे | खुला | महिला |
| 53 | संगमेश्वर | बुरंबाड | खुला | महिला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 54 | संगमेश्वर | करंडेवाडी | खुला | --- |
| 55 | संगमेश्वर | बेलारीवाडी | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 56 | संगमेश्वर | घोडवली | खुला | महिला |
| 57 | संगमेश्वर | जंगलवाडी | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 58 | संगमेश्वर | निनावे | खुला | आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) |
| 59 | संगमेश्वर | साखरपा खूर्द | खुला | --- |
| 60 | संगमेश्वर | नवालेवाडी | खुला | --- |
| 61 | संगमेश्वर | आगरेवाडी (तुळसणी) | खुला | महिला |

⬆

- **वरील कंसात नमूद केलेले गावाचे नाव तलाठी सजा समजणेत यावा.**

## पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता

1) अर्जदार हा दहावी (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा.
2) (अ) वयोमर्यादेकरीता अर्जदाराचे दिनांक 04 सप्टेंबर 2023 रोजीचे वय विचारात घेतले जाईल.
   (ब) अर्जदाराचे वय दिनांक 04 सप्टेंबर 2023 रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.
   (क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.
3) अर्जदार हा स्थानिक व कायम रहिवासी असावा. (अर्जदाराने रेशन कार्ड, निवडणूक कार्ड, ओळखपत्र, आधारकार्ड, स्वयंघोषणापत्र किंवा ज्या पुराव्याने स्थानिक व कायम रहिवासी असल्याचे सिध्द होते, अशा कोणत्याही एका पुराव्याची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील व मुलाखातीचे वेळी मूळ पुरावा सादर करणे आवश्यक राहील.)
4) अर्जदाराने अर्जामध्ये स्वत:चा ई-मेल व मोबाईल क्रमांक नमूद करणे अनिवार्य आहे.
5) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.
6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक (अर्जदार यांची अर्हता दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत)
7) अनु. जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, वि.जा- अ, व भ.ज.ब,क,ड प्रवर्गाच्या आरक्षित पदाकरीता सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहिल.
8) आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) या प्रवर्गाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.
9) इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विजा (अ) व भज- (ब), (क), (ड) या प्रवर्गातील महिला पदांसाठी अर्ज करणाऱ्या अर्जदार यांना भरती कालावधी करीता वैध असलेले उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

**परीक्षेचे स्वरुप**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परीक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | तोंडी परीक्षा गुण | एकूण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील:-**

1) पोलीस पाटील पदाची लेखी परीक्षा 80 गुणांची असेल प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2) लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3) लेखी परीक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती चालू घडामोडी इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4) लेखी परीक्षेत एकूण 80 गुणांपैकी किमान 36 गुण (45%) प्राप्त केलेल्या अर्जदारामधील उच्चतम गुण मिळालेल्या पर्याप्त प्रमाणातील अर्जदाराची तोंडी परीक्षा घेण्यात येईल.
5) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रनिम/2010/2009/प्र. क्र.66/10/13-अ दिनांक 16/06/2010 मधील तरतुदीनुसार लेखी परिक्षा घेतेवेळी उत्तर पत्रिकेवर उत्तर लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचा बॉलपेन वापर करावा लागेल.
6) लेखी परीक्षेत मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस पाटील भरती / निवडीसाठी घेण्यात येणाऱ्या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील तोंडी परीक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल.
7) एखादया उमेदवाराला मुलाखतीत शुन्य गुण मिळाले असले तरी लेखी व तोंडी परीक्षेतील गुणांच्या आधारे तो जर गुणवत्ता यादीत येत असेल तर असा उमेदवार पोलीस पाटील पदावरील निवडीकरिता पात्र राहील.

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1) प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस पात्रता व इतर संबंधीत मूळ प्रमाणपत्र तपासणीसाठी उपलब्ध करुन दयावी अन्यथा तोंडी परीक्षा अंतिम निवडीसाठी त्याचा विचार केला जाणार नाही.
2) लेखी परिक्षा, तोंड़ी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता तसेच प्रवेशपत्र, भरती कार्यक्रम, विविध सूचना या केवळ संकेत स्थळावरुनच उपलब्ध करण्यात येतील, पोस्टाद्वारे पाठविण्यात येणार नाहीत. सबब सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमा बाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
3) लेखी परीक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांचे जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती यांच्या आधारे मूळ कागदपत्रे पडताळणी करण्याकरीता अंतरीम स्वरुपात यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदाराची जाहिरातीनुसार आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती, परिक्षा शुल्क, कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल अशाच अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता अर्जात भरलेली माहिती व मूळ कागदपत्रे तपासणीच्या वेळी सादर केलेली कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द होवू शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परिक्षा शुल्क इत्यादी सारख्या सवलती नामंजूर करण्यात येतील, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.
4) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे अधिक्षक, ग्रामिण रुग्णालय यांचे अथवा वरिष्ठ वैद्यकीय अधिका-यांचे प्रमाणपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील व अर्जदाराची पात्रता वैद्यकीय तपासणी अंतीच निश्चित करण्यात येईल.
5) अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारीत्र्य प्रमाणपत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
6) अर्जदारांचे कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे तो इतर ठिकाणी संपूर्ण वेळ नोकरी करणारा व ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा, अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा. याबाबतचे रुपये 100/- च्या स्टॅम्प पेपरवरील प्रतिज्ञापत्र हे कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील.
7) अर्जदार संबंधीत गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.
8) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबबअर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.
9) प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षितकरण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरीक्त असलेल्या उमेदवारांनी अर्ज करु नये.)
10) संपूर्ण रत्नागिरी जिल्हयात रत्नागिरी उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व वेळी परिक्षा घेण्यात येईल.
11) संपूर्ण भरती प्रक्रिया गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.
12) पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.
13) पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पदधारण करणारी व्यक्ती ही शारिरिक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांनाअपंगासाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

14) पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते, त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांनाप्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.

15) महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत प्रमाणपत्र सादर करावे. तसेच महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णक क्र. महिआ२०२३/प्र.क्र.२२३/कार्या- २ दि. ४ मे २०२३ अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षीत असलेल्या पदावरती निवडीकरिता नॉनक्रिमीलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागासप्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणाऱ्या महिलांना त्या त्या मागासप्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासना कडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

16) आर्थीकदृष्टया दुर्बल घटक (E.W.S) या प्रवर्गाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.

17) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणाऱ्या उमेदवारांना विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

18) समान गुण मिळाल्यास शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक अर्जदाराला समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतीम निवड केली जाईल.

1) पोलीस पाटलांचे वारस, (पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती, पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्याव्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही.) त्यानंतर

2) अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर

3) माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर

4) वयाने जेष्ठ असलेले अर्जदार,

19) याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय वपरि

20) पत्रके तसेच नेमणुकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी सुध्दा बंधनकारक असतील.

21) हा जाहिरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापुर्वी ज्या उमेदवारांनी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत, असे समजण्यात येईल.

**<u>ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत</u>**

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त https://ratnagiri.ppbharti.in या अधिकृत संकेतस्थळावरून विहित पध्दतीने भरलेले ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना **उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, रत्नागिरी** हे जबाबदार असणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

2) पात्र उमेदवाराला वेब बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://ratnagiri.ppbharti.in या वेबसाईटद्वारे दिनांक 07/09/2023 ते दिनांक 20/09/2023 या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील

3) उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील व याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही.जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण वगैरेची पात्रता तपासून ऑनलाईन अर्ज भरावा.

4) उमेदवाराची लेखी परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार कोणतेही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतर उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. लेखापरिक्षेच्या प्राथमिक चाळणी/तोंडीपरीक्षेनुसार गुणवत्तेच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहित पात्रतेनुसार अंतरीम यादी

प्रसिध्द करून उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार **उपविभागीय दंडाधिकारी रत्नागिरी** यांचे जवळ राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

5) ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना https://ratnagiri.ppbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. ऑनलाईनपध्दतीने शुल्क भरणा-या उमेदवारांनी त्यांचा व्यवहार यशस्वी (Payment Transaction Successful) झाल्याची खात्री करुन घ्यावी प्रक्रीया शुल्क भरण्याकरीता नेट बँकींग, डेबीट कार्ड/ क्रेडीट कार्ड वापरुन होणा-या व्यवहाराची संपूर्णत: जबाबदारी उमेदवाराची आहे. **उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, रत्नागिरी** याला जबाबदार असणार नाही.

6) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करताना स्वत:चा अद्ययावत (Latest) विहीत नमुन्यातील पासपोर्टसाईज फोटो व सही स्कॅन करुन https://ratnagiri.ppbharti.in मधील सूचनेनुसार विहीत पध्दतीने अपलोड करणे अनिवार्य आहे.

7) ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम तारीख व वेळेनंतर संकेत स्थळावरील ऑनलाईन अर्ज भरण्याची लिंक बंद केली जाईल.

8) ऑनलाईन अर्ज प्रक्रीयेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहीत परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा /वेळापत्रक /परीक्षा केंद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती नमूद केलेल्या(वेबसाईट) वर वेळोवेळी उपलब्ध्र करुन देण्यात येईल. यासंबधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सदर संकेत स्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.

9) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण विभाग, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात नोंदविलेली आहेत, अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परीक्षाशुल्क भरणे आवश्यक राहील. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, अशा उमेदवाराना या कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही.

10) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचाअथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हताधारण न करणारा आढळल्यास खोटी माहिती पुरविल्यास किंवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतूनबाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्तकरण्यात येईल व त्याच्याविरुध्दकायदेशीर कारवाई करण्यात येईल.

11) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रेखोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

12) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.

13) परीक्षेस पडताळणीस मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे.

14) अर्जदाराने भरती प्रक्रीये दरम्यान राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अशा उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

15) वरील अटी, शर्ती नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय लागू राहतील.

दिनांक : 04/09/2023
ठिकाण : **रत्नागिरी**

उपविभागीय दंडाधिकारी, रत्नागिरी, रत्नागिरी

**उपविभागीय दंडाधिकारी, रत्नागिरी**
**तथा,**
**अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती**
**प्रक्रिया समिती — 2023**

# जाहीरनामा

## उपविभागीय दंडाधिकारी रत्नागिरी यांचे कार्यालय, जिल्हा रत्नागिरी
## पोलिस पाटील पदभरतीसाठी जाहिरात 2023
## जाहिरात क्र. 01/2023

रत्नागिरी जिल्हयातील **रत्नागिरी** उपविभागातील उपविभागीय दंडाधिकारी, **रत्नागिरी** कार्यालयांतर्गत गाव पोलिसपाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवाराकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच https://ratnagiri.ppbharti.in या संकेतस्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत.

**रत्नागिरी** उपविभागातील पोलिस पाटील संवर्गातील एकूण रिक्त पदे–169

| ऑनलाईन अर्ज भरण्याची सुरवात | ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत |
|---|---|
| दिनांक 07/09/2023 पासून | दिनांक 20/09/2023 रोजी 23-59 वाजेपर्यंत |

पोलिस पाटील भरती प्रक्रियासंदर्भात सविस्तर जाहीरात https://ratnagiri.ppbharti.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी संपूर्ण माहीती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरीता केवळ उक्त संकेत स्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज, विहित चलनाव्दारे भरलेले प्रक्रियाशुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहिल. लेखी परीक्षेचा दिनांक, वेळ, केंद्र, प्रवेशपत्र याबाबतची माहिती उपरोक्त संकेतस्थळाद्वारेच उपलब्ध होईल.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगीत करणे किंवा रद्द करणे, अशंत: बदल करणे, पदांच्या एकूण वर्गवारी निहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट, आरक्षणात बदल करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिये संदर्भात प्राप्त तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार **उपविभागीय दंडाधिकारी, रत्नागिरी** यांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल.

दिनांक : 04/09/2023
ठिकाण : **रत्नागिरी**

**उपविभागीय दंडाधिकारी, रत्नागिरी**
**तथा,**
**अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती**
**प्रक्रिया समिती – 2023**